# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (शिक्षण विभाग)

E-mail ID - education.nmc@gmail.com
Landline No.0712-2567028

जा.क्र.2687/शि.वि. / 2016
दि.18/08 / 2016

प्रती,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापीका,
सर्व मराठी/हिंदी/उर्दू म.न.पा.
प्राथ./उच्च प्राथ./माध्य. शाळा

**विषय : खालील शालेय माहिती तातडीने सादर करण्याबाबत.**

उपरोक्त विषयान्वये सूचीत करण्यात येते की,

1. **स्टॉक बुक व लेजर बुक अद्ययावत करणे –**
   आपल्या शाळेत विविध प्रकारचे साहित्य माध्यमिक शाळा निधी, सर्व शिक्षा अभियान व राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान अंतर्गत तसेच शाळेतर्फे खरेदी केले जाते. तसेच कार्यालयामार्फत, स्वयंसेवी संस्थेमार्फत विविध साहित्य आपल्या शाळेला मिळत असते. अशा सर्व प्रकारच्या निधिव्दारा खरेदी करण्यात आलेल्या साहित्याची माहिती स्टॉक बुक मध्ये असणे अनिवार्य आहे. आपल्या शाळेतील स्टॉक बुक त्वरीत अद्ययावत करावे. चालु वर्षातील स्टॉक बुक यांना अद्ययावत क्रमांक देणे. याबाबत माहिती फलक तयार करुन दर्शनी भागावर लावावा. स्टोर रुम असल्यास तेथे स्टोर रुम चा फलक लावावा. शालेय साहित्य कुठे ठेवलेले आहे, याची अद्ययावत माहिती मु.अ. व कर्मचारी यांनी ठेवावी.
2. **घड्याळी तासिका शिक्षकांची माहिती –**
   घड्याळी तासिका शिक्षकांचे वेतन नस्ती पाठवितांना त्यांचे नियुक्ती आदेश संलग्न करुन पाठविणे आवश्यक आहे. त्याशिवाय देयक मंजुर करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.
3. **समाज कल्याण शिष्यवृत्ती व अपंग शिष्यवृत्ती –**
   आपल्या शाळेतील इ.5ते10 मध्ये गुणानूक्रमे पहिल्या 2 मागासवर्गीय विद्यार्थ्यांची मु.अ. यांनी साक्षांकित केलेली माहिती व गुणपत्रिका सादर करावी. इ. 10 च्या परिक्षेत मागासवर्गातील विद्यार्थ्यांची यादी दि.31 ऑगस्ट, 2016 पर्यंत व्दिप्रतीत आपल्या झोनच्या शाळा निरीक्षक यांचेकडे सादर करावी. तसेच अपंग विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज ऑनलाईन भरावे. तसेच सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती व अस्वच्छ व्यवसाय करणाऱ्या पालकांच्या मुलांना मिळणारी शिष्यवृत्ती अंतर्गत सन 2015-16 मध्ये भरलेले विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती नुतनिकरण दि.5 सप्टेंबर, 2016 पर्यंत ऑनलाईन पुर्ण करावी.

वरील सर्व माहिती त्वरीत आपल्या झोनच्या शाळा निरीक्षक यांचेकडे सादर करावी.

**(फारुक अहमद खान)**
**शिक्षणाधिकारी**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**

**प्रतिलिपी,**

1. मा.सभापती, शिक्षण समिती, म.न.पा., नागपूर यांना माहितीस्तव सविनय सादर.
2. मा.उपायुक्त(I), म.न.पा., नागपूर यांना माहितीस्तव सविनय सादर.
3. शाळा निरीक्षक, झोन क्र.1ते10, यांना उचित कार्यवाहीस्तव.